## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**मा. वसंत एस. यादव साहेब, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: २००/२०२६**

**शाम व इतर – विरूध्द निरंक**

अर्जदार- **१) शाम पि.राम उर्फ रामभाऊ उर्फ रामा पांढरे, वय – ५४ वर्षे, धंदा-शेती, रा. राजुरी (न.) ता.जि.बीड. २) नंदा भ्र. बन्सी शिंदे, वय ६५ वर्षे, धंदा घरकाम, रा. अंजनवती ता.जि. बीड ३) सत्यशीला भ्र. कचरु जमदाडे, वय ६० वर्षे, धंदा घरकाम, रा. पारगांव सिरस ता.जि.बीड. ४) मंडोधरी भ्र.शिवाजी लांडगे, वय – ५६ वर्षे, धंदा घरकाम, रा. माळेवाडी ता. शिरुर(का) जि.बीड**

ज्याअर्थी मयत नामे राम ऊर्फ रामभाऊ ऊर्फ रामा पि. डिगाजी पांढरे रा. राजुरी न. ता.जि.बीड हे दि. २६. ०९.२०२२ रोजी मौजे राजुरी न. ता.जि.बीड येथे मयत झाले आहेत.

शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे राम ऊर्फ रामभाऊ ऊर्फ रामा पि.डिगाजी पांढरे रा राजुरी न. ता.जि.बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज ३०/०१/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिलं. **पुढील तारीख : १७/०४/२०२६**

**(मार्फत– ॲड. डी. एम. रोटे बीड)**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व . स्तर बीड**

**शिक्का** **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

## जाहीर प्रगटन

**मा.श्रीमती आर. एम. सातव, तदर्थ जिल्हा न्यायाधीश – ३, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क. : ६३ / २०२६**

अर्जदार- सारीका रामराव बांगर, वय ४१ वर्ष, रा. भायाळा ता पाटोदा जि. बीड

:: विरूध्द ::

गैरअर्जदार – महाराष्ट्र शासन मार्फत जिल्हाधिकारी कार्यालय, ता. जि. बीड

मागणी :- अज्ञानाचे नावे असलेली मालमत्ता हस्तांतरण/ विक्री करण्याची परवानगी मिळणेबाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात असा अर्ज दिला आहे की, अज्ञान नामे यशराज रामराव बांगर, वय ११ वर्षे मौजे बेनुसर, ता. पाटोदा जि. बीड येथील गट क्र ५३६ मधील अज्ञानाचे नावे असलेली १ हे १२ आर जमीन ही पुर्ण जमीन अज्ञानाच्या हिस्सा क्षेत्रासह सदर मिळकत विक्री करण्याची परवानगी मिळणे बाबतचा अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी कोणास यासंबंधी आक्षेप असेल तर त्यांनी सदरील प्रगटन प्रसिध्दीपासून (३०) तीस दिवसांच्या आत या न्यायालया समोर स्वतः किंवा वकिलामार्फत हजर रहावे, अन्यथा अर्जाची सुनावणी होवून नियमाप्रमाणे आदेश दिला जाईल.

आज दिनांक ३१/०३/२०२६ रोजी माझे सहिने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**प्रकरणातील पुढील तारीख : २०/०४/२०२६.**

**अर्जदारातर्फे वकिल :- ॲड. डी. एम. रोटे**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक जिल्हा न्यायालय बीड**

**शिक्का** **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एम. फडतरे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १९६/२०२६**

अर्जदार- **१) त्रिंबक पि. निवृत्ती दराडे, वय-७८ वर्षे, धंदा-शेती, रा. दराडेचावाडा पो. मोरगांव ता. जि. बीड. (२) सुशालाबाई भ्र. त्रिंबक दराडे, वय-८२ वर्षे, धंदा-घरकाम, रा. दराडेचावाडा पो. मारेगांव ता. जि. बीड.**

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक — अर्जदार हे भारतीय आहेत

प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नामे ज्ञानेश्वर पि. त्रिंबक दराडे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नामे ज्ञानेश्वर पि. त्रिंबक दराडे, रा. दराडेचावाडा, मोरगांव, ता. जि. बीड हे दिनांक ०४/०८/२०२४ रोजी मोरगांव ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ हे मयताचे वडील असून अर्जदार क्र. २ ही मयताची आई आहे. मयत ज्ञानेश्वर पि. त्रिंबक दराडे हा अविवाही होता त्यामुळे त्यास पत्नी किंवा मुलबाळ नाही. अर्जदार यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय कामासाठी, कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. **पुढील दिनांक २८/०४/२०२६**

आज दिनांक २४/०३/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**(ॲड. रोटे डी. एम.)**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व स्तर बीड**

**शिक्का** **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

## जाहीर प्रगटन

**मा. श्री आर. जी. बागडे साहेब, ६वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज १९८/२०२६**

**सुमित्राबाई विरूध्द निरंक**

अर्जदार -**१. सुमित्राबाई भ्र. पांडुरंग धुरे, वय – ८० वर्षे, धंदा- घरकाम, रा. नामलगांव ता.जि. बीड. २. प्रकाश पि. पांडुरंग धुरे. वय – ६१ वर्षे, धंदा-शेती रा.सदर. ३. पुसाराम पि. पांडुरंग धुरे. वय – ५३ वर्षे, धंदा-शेती रा. सदर. ४. आसाराम पि. पांडुरंग धुरे. वय-५० वर्षे, धंदा-शेती रा. सदर**

विरुध्द निरंक

मागणी- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात पांडुरंग पि. किसन धुरे यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी **मयत पांडुरंग पि. किसन धुरे यांचा मृत्यु दिनांक २२/०१/२०१० रोजी झाला** आहे. वरील अर्जदार क्र. १ ते ४ व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत पांडुरंग पि. किसन धुरे यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदार क्र. १ ते ४ यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार क्र. १ ते ४ सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत पांडुरंग पि. किसन धुरे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०२/०४/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयाने दिले.

**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०९/०४/२०२६ आहे.**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व . स्तर बीड**

**शिक्का** **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

## जाहीर प्रगटन

**मा. माणिकराव रा. सातव ७वे सह. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. २२५/२०२६**

**कचरु व इतर वि. निरंक**

अर्जदार – **(१) कचरू सखाराम पेंढारे, वय ६५ वर्षे, धंदा शेती, रा. लोहार गल्ली, पिंपळनेर ता. जि. बीड. २) चंद्रकांत सखाराम पेंढारे, वय ६१ वर्षे, धंदा शेती, रा. सदर. ३) राधाकिसन सखाराम पेंढारे, वय ५३ वर्षे, धंदा शेती, रा. सदर.**

**विरुध्द**

गैरअर्जदार- निरंक

मागणी : भारतीय वारसाचा कायदा कलम ३७२ नुसार.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत लक्ष्मीबाई भ्र. सखाराम पेंढारे यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी लक्ष्मीबाई भ्र. सखाराम पेंढारे, यांचा मृत्यु दि.१०/०५/२००६ रोजी रा. पिंपळनेर ता. जि. बीड येथे मयत झालेले असून अर्जदार मयत लक्ष्मीबाई भ्र. सखाराम पेंढारे यांचे वारस आहे. वरील अर्जदार यांना शासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्र याची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट अर्जदार हयांचे हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहू मयत लक्ष्मीबाई भ्र. सखाराम पेंढारे यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याचीनोंद घ्यावी.

आज दिनांक ०१ माहे ४ सन २०२६ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्याने दिले. **सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०६/०५/२०२६ आहे.**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर बीड**

**शिक्का** **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

## जाहीर प्रगटन

**मा. माणिकराव रा. सातव ७वे सह, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क. १९९/२०२६**

**संतोष व इतर वि. निरंक**

अर्जदार – **१. संतोष पि. लक्ष्मण नथने, वय ४७ वर्षे, धंदा शेती, रा. नामलगाव ता. जि. बीड. २. विठ्ठल पि. लक्ष्मण नथने, वय ४६ वर्षे, धंदा शेती, रा. सदर ३. महादेव पि. लक्ष्मण नथने वय ४५ वर्षे, धंदा शेती, रा. सदर.**

विरुध्द

गैरअर्जदार – निरंक

मागणी : भारतीय वारसाचा कायदा कलम ३७२ नुसार. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत लक्ष्मण पि. नारायण नथने यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी **लक्ष्मण पि. नारायण नथने, यांचा मृत्यु दि.१३ /०३/२०१७ रोजी कुर्ला, नामलगाव ता. जि. बीड** येथे मयत झालेले असून अर्जदार मयत लक्ष्मण पि. नारायण नथने यांचे वारस आहे. वरील अर्जदार यांना शासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्र याची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट अर्जदार हयांचे हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहू मयत लक्ष्मण पि. नारायण नथने यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याचीनोंद घ्यावी.

आज दिनांक ०१ माहे ०४ सन २०२६ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्याने दिले. **सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०९/०४/२०२६ आहे.**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर बीड**

**शिक्का** **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती वंदना व्ही. जोशी, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क. २०५/२०२६**

**संध्या भ्र. प्रकाश ओव्हाळ वि. निरंक**

अर्जदार -**१. संध्या भ्र. प्रकाश ओव्हाळ, वय – ५३ वर्षे, धंदा-घरकाम, रा. सय्यद नगर, पांगरी रोड, बीड ता. जि. बीड** विरुध्द

गैरअर्जदार – निरंक

प्रकरणः-भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत शारदाबाई भ्र. अर्जुन सातपुते यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

**मयत शारदाबाई भ्र.अर्जुन सातपुते हे दिनांक १४/१२/२०२५ रोजी सय्यद नगर, पांगरी रोड, बड ता. जि. बीड** मयत झालेल्या आहेत. अर्जदार ही मयताची विवाहीत मुलगी आहे. अर्जदाराशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहु मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत नामे मयत शारदाबाई भ्र. अर्जुन सातपुते रा. सय्यद नगर, पांगरी रोड, बीड ता.जि.बीड यांचे अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस म्हणुन घोषीत करुन अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**पुढील तारीख ०७/०५/२०२६.**

आज दिनांक ०१/०४/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**(ॲड. जी. एम. केकान)**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर बीड**

**शिक्का** **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

## जाहीर प्रगटन

**मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ५०७ / २०२६**

CNR No. MHBI0200009912026

**गोरक्ष आश्रुबा रसाळ व ईतर वि. निरंक**

अर्जदार :-**१. गोरक्ष पि. आश्रुबा रसाळ, वय-६६ वर्षे, धंदा-शेती, रा. मांजरसुंबा ता. जि. बीड. २. सुभाष पि. आश्रुबाराव रसाळ, वय ६४ वर्षे, धंदा-शेती, रा. सदर ३. अरूण पि. आश्रुबा रसाळ, वय-६० वर्षे, धंदा-शेती, रा. सदर. ४. संजय पि. आश्रुबा रसाळ, वय-५६ वर्षे, धंदा-शेती. रा. सदर. ५. कुसूमबाई भ्र. विठ्ठलराव गिराम, वय-६८ वर्षे, धंदा-घरकाम, रा. नवजीवन शिक्षक कॉलनी, बीड ता. जि. बीड. ६. उषा भ्र. संजय पाटील, वय-५२ वर्षे, धंदा-घरकाम, रा. तिरूपती नगर, बीड ता. जि. बीड** विरुध्द निरंक

मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात आश्रुबा पि. रंगनाथ रसाळ यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी **मयत आश्रुबा पि. रंगनाथ रसाळ यांचा मृत्यु दिनांक १७/१२/२०२५ रोजी** झाला. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क. १ ते ४ हे मयताचे मुले असून अर्जदार क. ५ व ६ या मयताच्या विवाहित मुली आहेत. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

मयत आश्रुबा पि. रंगनाथ रसाळ यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. **प्रकरणातील पुढील तारीख ०४/०५/२०२६**

आज दिनांक ३१ माहे मार्च २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**(मार्फत – ॲड. जी. एम. केकान)**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक सह दिवाणी न्यायालय क. स्तर बीड**

**शिक्का** **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. कृष्णराव के. पाटील २ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ३४९/२०२६**

**सतिश जाधव वि. निल**

मागणी:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत. अर्जदारः **१) सतिश पि. मुरलीधर जाधव, वय: ४६ वर्षे, धंदाः नौकरी, रा. सुभाष कॉलनी, इदगाह रोड, पेठ बीड, ता. जि.बीड. २) लक्ष्मीबाई भ्र नामदेव जाधव, वय: ६६ वर्षे, धंदा घरकाम, रा. वरील प्रमाणे. ३) सुमित्रा भ्र. श्रीधर जाधव, वय: ५५वषे, धंदा: घरकाम, रा. सदर. ४) शशिकांत पि.श्रीधर जाधव, वय: ४१ वर्ष, धंदा घरकाम, रा. सदर**

विरूध्द निरंक

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. ज्याअर्थी **मयत नामे विश्वनाथ पि.रामा जाधव, राहणार – सुभाष कॉलनी, इदगाह रोड, पेठ बीड, ता. जि. बीड हे दिनांक २०/१२/१९९९ रोजी सुभाष कॉलनी, इदगाह रोड, पेठ बीड, ता. जि. बीड येथे मयत** झालेले आहेत.

अर्जदार क्र. १ व ४ हे मयताच्या मयत मुलाचे मुले म्हणजेय नातु आहेत. तसेच अर्जदार क्र. २ व ३ या मयताच्या सुना आहेत.

मयत नामे विश्वनाथ पि.रामा जाधव, यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत विश्वनाथ पि.रामा जाधव यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. **सदर प्रकरणात पुढील तारीख ०८/०४/२०२६ आहे. आज दिनांक ०१/०४/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले. (विधीज्ञ – श्री. केकान जी. एम.)**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर बीड**

**शिक्का** **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती एस. डी. सोनी ३ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ३२६/२०२६**

**पुष्पा भ्र. भिमाशंकर काळे व इतर वि. निरंक**

मागणी:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

अर्जदारः **१) पुष्पा भ्र. भिमाशंकर काळे, वय- ८० वर्षे, धंदा-घरकाम, रा. घारगाव ता.जि.बीड ह.मु. मुलुंड नागराज, मुलुंड पुर्व, मुंबई. २) अपर्णा भ्र. संजय परमाळे, वय-५१ वर्षे, धंदा-घरकाम, रा. गवळी नगर, दिघी रोड, उंब-या चौक, पुणे ता. जि. पुणे ३) अर्चना भ्र. विजय तांबेकर, वय- ४६ वर्षे, धंदा-घरकाम, रा. रुक्मीणी सदर सोसायटी, टिळक रोड, पुणे, ता.जि.पुणे**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. ज्याअर्थी मयत नामे लक्ष्मण विठोबा काळे हे दिनांक २६/१२/२०१२ रोजी मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. १ ही मयतांची सुन असून अर्जदार क्र. २ व ३ हया मयताच्या विवाहित नाती आहेत. अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारसदार नाहीत.

मयत नामे लक्ष्मण विठोबा काळे यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत लक्ष्मण विठोबा काळे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. **सदर प्रकरणात पुढील तारीख ०४/०४/२०२६ आहे.**

आज दिनांक २७/०२/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

**(विधीज्ञ – जी.एम. केकान)**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर बीड**

**शिक्का** **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती वंदना व्ही. जोशी, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क. ४९४/२०२६**

**सत्यशिला भ्र. अशोक जगताप व इतर वि. निरंक**

अर्जदार- **१.सत्यशिला भ्र. अशोक जगताप, वय – ३३ वर्षे, धंदा – घरकाम, रा. माऊली नगर, पांगरी रोड, बीड ता. जि. बीड. २. अदिराज पि. अशोक जगताप, वय – १५ वर्षे, धंदा – शिक्षण, अज्ञान अ.पा. क. आई अर्जदार क. १ रा. सदर. ३. विराज पि. अशोक जगताप, वय-० ०८ वर्षे, धंदा- शिक्षण, अज्ञान अ.पा. क. आई अर्जदार क्र. १ रा. सदर. ४. राहिबाई भ्र. परशुराम उर्फ परसराम जगताप, वय – ६० वर्षे, धंदा – घरकाम, रा. सदर.५. परशुराम उर्फ परसराम पि.दिंगाबर जगताप, वय ६२ वर्षे, धंदा – शेती, रा. सदर.** विरुध्द

गैरअर्जदार- निरंक

प्रकरणः- भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी अशोक पि परसराम उर्फ परशुराम जगताप यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत अशोक पि. परसराम उर्फ परशुराम जगताप हे दिनांक २८/११ / २०२५ रोजी मॅक केअर हॉस्पीटल, अहिल्यानगर ता. जि. अहिल्यानगर येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार क. २ व ३ हे मयताचे मुले आहेत. तसेच अर्जदार क्र. ४ व ५ हे मयताचे आई-वडील आहेत. अर्जदार क. २ व ३ हे अज्ञान असुन त्यांची अ.पा. क. आई अर्जदार क. १ ही आहे. मयतास अर्जदारांशिवाय ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहु मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात. येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत नामे अशोक पि. परसराम उर्फ परशुराम जगताप यांचे अर्जदार हे कायदेशीर वारस म्हणुन घोषीत करुन अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**पुढील तारीख ०६/०५/२०२६.** आज दिनांक ३१/ ०३ / २०२६ सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर बीड**

**शिक्का** **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. मा.ये. वाघ ५ वे दिवाणी न्यायाधीश व. स्तर, बीड, ता. जि. बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. २७६ / २०२६**

**द्रोपदी जाधव वि. निरंक**

ज्यापेक्षा **बप्पा पि. दगडु जाधव, हे दिनांक ०४/०४/२०२५ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, व सर्वोपचार रुग्णालय, बारामती, पुणे येथे मयत** झालेले आहे, आणि तसेच अर्जदार

**१.द्रोपदी भ्र. बप्पा जाधव, वय ४७ वर्षे, धंदा. घरकाम, रा. चौसाळा, ता. जि. बीड. २. नंदिनी भ्र. खंडू शिंदे, वय २५ वर्षे, धंदा. घरकाम, रा. चौसाळा, ता. जि. बीड. ३. सोनाली भ्र. विशाल पवार, वय २३ वर्षे, धंदा घरकाम, रा. ओतुर, पुणे.**

अर्जदार क्र. १ हि मयताची पत्नी असुन, अर्जदार क्र. २ व ३ या मयताच्या विवाहीत मुली आहेत. या अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत, असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा / अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहु मयत नामे बप्पा पि. दगडु जाधव, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. **प्रकरणाची पुढील तारीख १५/०४/२०२६ ही आहे.**

आज दिनांक ३१ मार्च २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. **(ॲड. टी. ए. जाधव यांचे मार्फत)**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर बीड**

**शिक्का** **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायधिश साहेब (क. स्तर) शिरुर कासार, यांचे न्यायालयात**

**कि.दि.अर्ज क्रमांक- ८२/२०२६**

अर्जदार :- **१) शालन भ्र. शाहुराव शिंदे वय ५८ वर्षे, धंदा घरकाम व शेती, रा. हिवरसिंगा, ता. शिरुर कासार, जि. बीड. २) दादासाहेब पि. शाहुराव शिंदे वय ३७ वर्षे, धंदा- नौकरी, रा. हिवरसिंगा, ता. शिरुर कासार, जि. बीड. ह.मु. पुसेगाव, ता. खटाव, जि. सातारा. ३) नानासाहेब पि. शाहुराव शिंदे वय – ३४ वर्षे, धंदा-शेती, रा. हिवरसिंगा, ता. शिरुर कासार, जि. बीड.** विरुध्द

गैरअर्जदार :- नील.

अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत.

यापेक्षा **मयत नामे शाहुराव पि. विठ्ठल शिंदे, रा. हिवरसिंगा, ता. शिरुर कासार, जि. बीड येथील रहीवशी असुन ते दिनांक २६/०३/२०२५ रोजी मौजे हिवरसिंगा, ता. शिरुर कासार, जि. बीड** येथे राहत्या घरी मयत झाले आहेत. अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नि असुन, अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले आहेत. अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे उपरोक्त मयत यांचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने मा. कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदती कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सरदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु अपरोक्त मयत यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक-३०/०३/२०२६ रोजी माझे सहीने व नयायालयाच्या शिक्यानिशी दिले **सदर प्रकरणात पुढील तारीख ५/५/२०२६ हि आहे.**

**(ॲड. एच. एस. कोठुळे)**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) सहा अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर शिरूर का.**

**शिक्का** **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

## जाहीर प्रगटन

**मा.श्रीमती आर. एम. सातव, तदर्थ जिल्हा न्यायाधीश – ३, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क. : ९१/२०२६**

अर्जदार- **१. रवींद्र शिवराम गव्हाणे, वय ३९ वर्ष, रा. लोळदगाव, पो. सिरसमार्ग ता गेवराई, जि. बीड. २. सुषमा रवींद्र गव्हाणे, वय ३२ वर्ष, रा. लोळदगाव पो सिरसमार्ग, ता गेवराई, जि. बीड**

:: विरूध्द ::

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन मार्फत जिल्हाधिकारी कार्यालय, ता. जि. बीड

मागणी :-

अज्ञानाचे नावे असलेली मालमत्ता हस्तांतरण / विक्री करण्याची परवानगी मिळणेबाबत.

ज्याअर्थी अर्जदार १ ते २ यांनी या न्यायालयात असा अर्ज दिला आहे की, अज्ञान नामे विश्वदीप रवींद्र गव्हाणे, वय १३ वर्षे मौजे अनकोटा, ता. गेवराई जि. बीड येथील गट क ६६ मधील अज्ञानाचे नावे असलेली ७९ आर जमीन ही पुर्ण जमीन अज्ञानाच्या हिस्सा क्षेत्रासह सदर मिळकत विक्री करण्याची परवानगी मिळणे बाबतचा अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी कोणास यासंबंधी आक्षेप असेल तर त्यांनी सदरील प्रगटन प्रसिध्दीपासून (३०) तीस दिवसांच्या आत या न्यायालया समोर स्वतः किंवा वकिलामार्फत हजर रहावे, अन्यथा अर्जाची सुनावणी होवून नियमाप्रमाणे आदेश दिला जाईल.

आज दिनांक ३१/०३/२०२६ रोजी माझे सहिने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**प्रकरणातील पुढील तारीख : २२/०४/२०२६.**

**अर्जदारातर्फे वकिल :- ॲड. के. व्ही. दाभाडे,**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक जिल्हा न्यायालय बीड**

**शिक्का** **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

## जाहीर प्रगटन

**मा. श्री आर. जी. बागडे साहेब, ६वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ५१२ / २०२६**

**उषा विरूध्द निरंक**

अर्जदार – **१. उषा भ्र. सिध्देश्वर टाक, वय-२२ वर्षे, धंदा घरकाम, रा. मोरगांव ता. जि. बीड. २. दिव्या पि. सिध्देश्वर टाक, वय-०४ वर्षे, अज्ञान, ३. दिव्यम पि. सिध्देश्वर टाक, वय-१० महिने अज्ञान, अज्ञान अर्जदार क. २ व ३ करीता अ.पा. क. आई. अर्जदार क.१ सर्व रा. मोरगांव ता.जि. बीड** विरुद्ध निरंक

मागणी – बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात सिध्देश्वर मोहन टाक यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी **मयत सिध्देश्वर मोहन टाक यांचा मृत्यु दिनांक १५/०१/२०२६ रोजी** झाला आहे. वरील अर्जदार क. १ ते ३ व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत सिध्देश्वर मोहन टाक यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदार क्र. १ ते ३ यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार क्र. १ व २ सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत सिध्देश्वर मोहन टाक यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०२/०४/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयाने दिले. **सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०७/०५/२०२६ आहे.**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर बीड**

**शिक्का** **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

## जाहीर प्रगटन

**मा. माणिकराव रा. सातव ७वे सह. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क. ५०१/२०२६**

**तनाबाई व इतर वि. निरंक**

अर्जदार- **१ तनाबाई गणपती आंधळे, वय ७७ वर्षे, धंदा घरकाम, रा. कारेगव्हाण, ता. जि. बीड. (२) रणजित गणपती आंधळे, वय ५६ वर्षे, धंदा शेती, रा. कारेगव्हाण ता. जि. बीड.** विरुद्ध

गैरअर्जदार- निरंक

मागणी : भारतीय वारसाचा कायदा कलम ३७२ नुसार.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत गणपती राघु आंधळे यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी **गणपती राघु आंधळे यांचा मृत्यु दि.०५ /११/२०२०२५ रोजी रा. मौजे कारेगव्हाण ता. जि. बीड** येथे मयत झालेले असून अर्जदार मयत गणपती राघु आंधळे यांचे वारस आहे. वरील अर्जदार यांना शासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्र याची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट अर्जदार हयांचे हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहू मयत गणपती राघु आंधळे यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याचीनोंद घ्यावी. आज दिनांक ०२ माहे ०४ सन २०२६ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्याने दिले. **सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १६/०६/२०२६ आहे.**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर बीड**

**शिक्का** **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● शुक्रवार दि. ०३ एप्रिल २०२६ ●

# जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते ऊसतोड कामगारांना ओळखपत्रांचे वितरण

## मार्च २०२६ अखेर जिल्ह्यात ५८४५ ऊसतोड कामगारांची नोंदणी पूर्ण

बीड । प्रतिनिधी

ऊसतोड कामगारांच्या समस्यांबाबत उपाययोजना करण्याचे निर्देश राज्य शासनास दिले. त्या अनुषंगाने राज्य शासनाने उच्च न्यायालयाच्या निर्देशांची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठित केली आहे. सदर समितीची बैठक दिनांक १ एप्रिल २०२६ रोजी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये किमान ३ वर्षापासुन ऊसतोड कामगार म्हणून काम करीत असलेल्या ऊसतोड कामगारांचे सर्वेक्षण करून नोंदणी करणे व त्यांना ओळखपत्र देणे या विषयावर सविस्तर चर्चा झाली. ऊसतोड कामगारांचे सर्वेक्षण करून त्यांची नोंदणी करणे व त्यांना ओळखपत्र देण्यासाठी शासनाने स्मार्ट सर्विसेस प्रायव्हेट लिमिटेड, पुणे या संस्थेची नियुक्ती केली आहे. बीड जिल्ह्यात ऊसतोडणी कामगाराच्या सर्वेक्षणाचे काम सुरू झाले असून दिनांक ३१ मार्च, २०२६ अखेर एकूण ५८४५ ऊसतोड कामगारांची नोंदणी करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते १ एप्रिल २०२६ रोजी जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत प्रातिनिधिक स्वरूपात १० ऊसतोड कामगारांना ओळखपत्राचे वितरण करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान, जिल्हा आरोग्य अधिकारी उल्हास गंडाळ, पोलीस उपअधीक्षक (गृह) उमाशंकर कस्तुरे, स्मार्ट सर्विसेस प्रायव्हेट लिमिटेड यांचे प्रतिनिधी सागर बोरा, सहायक आयुक्त, समाजकल्याण प्रदिप भोगले हे उपस्थित होते. जिल्हाधिकारी यांनी संस्थेच्या प्रतिनिधीना ऊसतोड कामगारांच्या सर्वेक्षणाचे काम जिल्हा प्रशासनाशी समन्वय ठेवून पुढील तीन महिन्याच्या कालावधीत पूर्ण करण्याच्या तसेच खऱ्या ऊसतोड कामगारांची नोंदणीच्या सूचना दिल्या. सोबतच बीड जिल्ह्यातील ऊसतोड कामगारांना संबंधित संस्थेकडे नोंदणी करण्यासाठी स्थानिक पातळीवर संपर्क करण्याचे आवाहन केले.



# एसआयआर मॅपिंगद्वारे मतदार यादीचे शुद्धीकरण करणे गरजेचे : सुनिल राणे



### ● बीडमध्ये एसआयआर बूथ प्रमुख मार्गदर्शन बैठक

बीड । प्रतिनिधी

आगामी २०२९ च्या निवडणुकीत यश मिळवण्यासाठी एसआयआर मॅपिंगद्वारे मतदार यादीचे शुद्धीकरण करणे आवश्यक असून यामधून अचूक व पारदर्शक मतदार यादी तयार होईल, असे मत भाजप प्रदेश सरचिटणीस सुनिल राणे यांनी व्यक्त केले. बीड शहरातील सौ.के.एस.के. महाविद्यालयाच्या सभागृहात बुधवारी (दि.१) बीड विधानसभा मतदारसंघातील एसआयआर बूथ प्रमुखांची मार्गदर्शन बैठक पार पडली. या बैठकीस भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, डॉ.योगेश क्षीरसागर, जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे, शहराध्यक्ष अशोक लोढा, जिल्हा सरचिटणीस रामदास बडे, गणेश लांडे, बीएलओ-१ नागेश तांबारे, नगरसेवक राजाभाऊ गुजर, शुभम धूत, मंगेश धोंगडे, मुन्ना गायकवाड आदी उपस्थित होते.

### ● रिल स्पर्धेतील विजेत्यांचा सत्कार

**श्रीराम नवमीनिमित्त आयोजित रिल स्पर्धेतील विजेत्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यामध्ये प्रथम ओंकार राऊत, द्वितीय रितेश सोळुंके तर तृतीय आर्यन कांडेकर यांचा समावेश होता.**

पुढे बोलताना सुनिल राणे यांनी सांगितले की, जुनी मतदार यादी रद्द करून नवीन मतदार नोंदणी प्रक्रियेत युवकांचे नाव समाविष्ट करणे, मृत व्यक्तींची नावे वगळणे तसेच नवविवाहित महिलांची नोंदणी करणे या प्रक्रियेत सर्वांनी सक्रिय सहभाग घ्यावा. यामुळे अचूक व विश्वासार्ह मतदार यादी तयार होण्यास मदत होईल. डॉ. योगेश क्षीरसागर यांनी सांगितले की, शहरात बीएलओ-२ यांच्या सहकार्याने मतदार मॅपिंगची प्रक्रिया शंभर टक्के पूर्ण होत असून मयत, दुबार व बोगस मतदारांची सुमारे १५ हजार नावे वगळली जाणार आहेत. नवमतदारांची नोंदणी, नवविवाहित महिलांची नोंदणी तसेच संवेदनशील भागांतील बूथ बदलणे आणि समाजमाध्यमांवर प्रभावी काम करणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शंकर देशमुख यांनी सर्व बीएलओ-२ यांनी सतर्क राहून निवडणूक लागल्याच्या तयारीने मतदार पुनरावलोकन प्रक्रियेवर किमान एक महिना काम करावे, असे आवाहन केले. प्रास्ताविक नागेश तांबारे यांनी केले, तर आभार भाजप जिल्हा सरचिटणीस गणेश लांडे यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# पाटोदा बाजार समितीकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरील डिव्हायडर तोडा



### ● नगरसेवक संतोष जाधव यांची मागणी

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरातील बाजार समितीकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर उभारण्यात आलेल्या डिव्हायडरमुळे मोठ्या वाहनांना अडचणी निर्माण होत असून यामुळे वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनली आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित डिव्हायडर तात्काळ तोडण्याची मागणी नगरसेवक संतोष जाधव यांनी केली आहे तसेच व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे की, बाजार समितीकडे येणाऱ्या मोठमोठ्या मालवाहू गाड्यांना वळण घेताना किंवा थांबताना पुरेशी जागा मिळत नाही. परिणामी, ही वाहने मुख्य रस्त्यावरच उभी राहतात आणि त्यामुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होतो. विशेषतः सकाळी व दुपारच्या वेळेत ट्रॅफिकची समस्या अधिक तीव्र होत असून नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.यामुळे आपत्कालीन सेवा, शालेय वाहतूक आणि दैनंदिन प्रवास करणाऱ्या नागरिकांनाही अडचणींचा सामना करावा लागत आहे. संबंधित प्रशासनाने परिस्थितीची गांभीर्याने दखल घेऊन त्वरित उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नगरसेवक संतोष जाधव यांनी केली आहे

# काला संत करतात तर त्याचे वाटप भगवंत करतो : ह.भ.प श्रीराम महाराज विडेकर

केज । प्रतिनिधी

काला करण्याचा अधिकार संतांना आहे मात्र या काल्यामध्ये सहभागी होऊन त्या प्रसादाचे वाटप मात्र स्वतः भगवंत करतो असे प्रतिपादन महंत श्रीराम महाराज विडेकर यांनी केले.

विडा येथे प्रतिवर्षा प्रमाणे श्री.राजा हनुमान महाराज जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहातील काल्याच्या किर्तना प्रसंगी बोलत होते.याप्रसंगी त्यांनी संत निळोबारायांनी अभंगाच्या माध्यमातून देव आणि भक्त एकत्र होऊन काला करतात त्या काल्याचे विशेषत्व सांगणा-या अभंगावर निरूपण केले .

काला करीती संतजन<br>
सवे त्यांच्या नारायण<br>
वाटी आपुल्या निज हस्ते<br>
भाग्याचा तो पावे तेथे<br>
लाही शीत लागे हाती<br>
दोष देखोनिया त्या पळती<br>
निळा म्हणे क्षीराचा बुंद<br>
लगता पावे ब्रह्मानंद



भगवंताचे भक्त काला करायला सुरुवात करतात तेव्हा भगवान परमात्माला देखील चैन पडत नाही आणि तो भगवान परमात्मा स्वतःच त्यांच्यामध्ये सहभागी होऊन तो वाटप करतो आणि हा काला जो भाग्यवान आहे त्यालाच प्राप्त होतो. याप्रसंगी ह.भ.प मनोज महाराज, ह.भ.प पुरुषोत्तम शास्त्री, ह.भ.प तुकाराम महाराज, मृदंगाचार्य अरुण महाराज, दादा महाराज मेटे,कल्याण आप्पा येवतेकर, रामहरी काटकर, रामहरी आंधळे, सखारामजी कदम, सुनील महाराज आंधळे,बापूराव मेटे यांच्यासह विडा गटाचे माजी जिल्हा परिषद सदस्य विजयकांत मुंडे, दत्तात्रय ठोंबरे, काका जाधव, बबन पवार, तुकाराम पटाईत, बाळू निर्मळ, बाबासाहेब पटाईत, बळीराम देशमुख, सरपंच सुरज पटाईत, गुणवंत बहुलेकर, कागदे महाराज, जगन्नाथ पटाईत, धनराज पवार, पराक्रम घुटे यांच्यासह परिसरातील भाविक -भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी निवृत्त पोलीस उपअधीक्षक दिलीपरावजी काळे साहेब यांची महाप्रसाद पंगती होती. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी राजा हनुमान प्रतिष्ठान व समस्त युवाजणांनी सहकार्य केले.

# द्वारकादास मंत्री बँकेस 2 कोटी 01 लाख रुपयांचा निव्वळ नफा : अध्यक्ष डॉ.आदित्य सुभाषचंद्रजी सारडा



## आर्थिक स्थिती अत्यंत बळकट : ६५ कोटी ७१ लाखांच्या ठेवी, ५८ कोटी १८ लाखांचे बँकेने वाटले कर्ज

बीड । प्रतिनिधी

बीड येथील द्वारकादास मंत्री नागरी सहकारी बँक लि.,बीड चे सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचे हिशोब पूर्ण झाले असून आर्थिक वर्षात बँकेस २०१ लाखांचा नफा झाला. बँकेची आर्थिक स्थिती अत्यंत बळकट असून ६५ कोटी ७२ लाखांच्या ठेवी तर ५८ कोटी २४ लाखांचे बँकेने कर्ज वाटप केले आहे. नवीन आर्थिक वर्षात बँक गरजूंना विविध कर्ज योजनांद्वारे तात्काळ कर्ज उपलब्ध करून देणार असल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष डॉ. आदित्य सुभाषचंद्र सारडा यांनी दिली.डॉ. आदित्य सारडा म्हणाले की, बँकेचे नेट वर्थ २१ कोटी ७५ लाख झाले आहे. बँकेच्या सभासदांनी भागभांडवलापोटी बँकेत १७ कोटी ८२ लाख गुंतवले आहेत. बँकेने सर्व प्रकारच्या तरतुदी व निधी रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे उभारले आहेत. बँकेकडे कर्ज वाटपासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध आहे. आजपासून सुरू होत असलेल्या नवीन आर्थिक वर्षात गरजूंना विविध प्रकारच्या कर्ज योजनांद्वारे तात्काळ कर्ज उपलब्ध करून देणार असल्याची माहिती - अध्यक्ष डॉ. आदित्य सुभाषचंद्रजी सारडा यांनी दिली. यावेळी बँकेचे उपाध्यक्ष शुभम चितलांगे, संचालक सी.ए. गिरीश गिल्डा, डॉ. आदिती सारडा, संतोष लहाने, अंजली पाटील, रघुनाथ चौधरी, डॉ. राहुल खडके, दिनेश देशपांडे, शेख मोहम्मद सलीम, प्रल्हाद वाघ, सुधाकर वैष्णव, राम गायकवाड, सतीश धारकर, बँकेचे प्र. मुख्यकार्यकारी अधिकारी शफियोद्दिन मोमीन, राधेश्याम सोनी यांच्यासह बँकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**बँकेचा सीआरएआर चे प्रमाण १०२.८२ टक्के, निव्वळ एन.पी.ए. चे प्रमाण ०.०० टक्के- वर्षाअखेर बँकेचा सीआरएआर चे प्रमाण १०२.८२ टक्के इतके झाले आहे. हे रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे ते सक्षम बँकेस तो ९ टक्के इतकाच लागतो. तो मंत्री बँकेचा १० पटीने जास्त आहे आणि निव्वळ एन.पी.ए. ०.०० टक्के आहे.**

**युद्ध काळातही बँक बळकट जिथे जागतिक बाजार मोठ्या प्रमाणात कोसळला आहे- वर्षाअखेर बँकेने शासकीय रोख्यांमध्ये ८० कोटीच्या वर गुंतवणूक केलेली असून जागतिक युद्धकाळात बाजारातील चढ-उतारामुळे कमी झालेल्या किमतींमुळे होणाऱ्या नुकसानीसाठीही बँकेने आवश्यक ती तरतूद घेतली आहे.**

## थोडक्यात...

### चौकशी प्राधिकृत अधिकारी यांची नामतालिका तयार करण्यासाठी अर्ज करावेत

बीड । प्रतिनिधी

विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर विभाग लातूर यांच्याकडून महाराष्ट्र सहकारी संस्थेत चौकशी प्राधिकृत अधिकारी यांची नामतालिका तयार करण्यासाठी सहकार खात्यातून निवृत्त झालेल्या अधिकारी (वयाची ७० वर्ष पूर्ण न झालेल्या), निवृत्त न्यायाधीश, वकिल, सनदी लेखापाल यांचेकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. अर्जाचे विहित नमूने विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर विभाग लातूर, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, लातूर, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर / धाराशिव / बीड / नांदेड व संबंधित जिल्ह्यातील सर्व उपनिबंधक व सहायक निबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयात दि. १ एप्रिल २०२६ ते दि. ३० मे २०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत मिळू शकतील व भरलेली परीपूर्ण अर्ज आवश्यक त्या कागदपत्रासह उक्त कालावधीत संबंधित कार्यालयात सादर करावेत असे विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था लातूर यांनी कळविले आहे.

### तलवाडा येथील सामजिक कार्यकर्ते तथा पत्रकार राजेन्द्र विटकर यांना पितृ शोक



तलवाडा । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार कालवा समिति सदस्य राजेन्द्र विटकर यांचे वडील विठ्ठलराव राजाराम विटकर यांचे तलवाडा येथील राहत्या घरी दिनांक २/४/२००२६ रोजी सकाळी ९.३० वाजता अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. त्यांचा अंत्यविधी तलवाडा येथील पावन दत्त मंदिर समोरील श्मशान भुमीत अंतिम संस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्च्यात तीन मुले तीन मुली जावई सुना नातवंडे पंतवंडे आसा मोठा परिवार आहे. तलवाडा व तलवाडा पंचक्रोशीतील हितचिंतकांची या अंत्यविधीस मोठ्या प्रमाणात उपस्थिति होती.

### पाटोदा शहरात दहावीपर्यंत एकही जि. प. शाळा नाही हे पाटोद्याचे भाग्य की दुर्भाग्य ?

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरात दहावीपर्यंत शिक्षण देणारी एकही जिल्हा परिषद शाळा उपलब्ध नसल्याची बाब समोर येत असून, यामुळे शिक्षण क्षेत्रात मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. ग्रामीण भागात जिल्हा परिषद शाळा ही सर्वसामान्य कुटुंबांसाठी शिक्षणाचा आधारस्तंभ मानली जाते. मात्र पाटोदा शहरातच अशी सुविधा नसणे हे आश्चर्यकारक मानले जात आहे. शहरातील विद्यार्थ्यांना दहावीपर्यंतचे शिक्षण घेण्यासाठी खासगी शाळांवर अवलंबून राहावे लागत आहे. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांवर अतिरिक्त भार पडत आहे. अनेक पालकांनी शासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन पाटोदा शहरात दहावीपर्यंतची जिल्हा परिषद शाळा सुरू करावी, अशी मागणी केली आहे.शिक्षण हा मूलभूत हक्क असताना, शहरातच शासकीय शिक्षणाची सोय नसणे हे प्रशासनाच्या दुर्लक्षाचा भाग असल्याची भावना व्यक्त होत आहे. काही जणांच्या मते, खासगी शिक्षण संस्थांना चालना मिळत असल्यामुळे शासन जिल्हा परिषद शाळांकडे दुर्लक्ष करत आहे,असा सवालही उपस्थित केला जात आहे.पाटोदा शहराचा सर्वांगीण विकास व्हायचा असेल, तर शिक्षण क्षेत्रात भक्कम पायाभूत सुविधा निर्माण करणे आवश्यक आहे. त्यामुळे आता तरी संबंधित विभागाने जागरूक होऊन योग्य ती पावले उचलावीत, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

### वैराग्याचे मूर्तिमंत रूप शांतीब्रम्ह नवनाथ बाबा: ह भ प गोपाळ महाराज थोटे

#### श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे पौर्णिमा निम्मित कीर्तन व महाप्रसाद

बीड । प्रतिनिधी



श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे चैत्र पौर्णिमेच्या निम्मित गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज मठाधिपती महंत श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी ह भ प गोपाळ महाराज थोटे यांचे सुश्राव्य कीर्तन सेवा संपन्न झाले. अभंग विवेचन करताना थोटे महाराज यांनी संताच्या ठाई वैराग्य असते ; धन, सत्ता, संपत्ती, मान, सन्मान ज्यांच्या साठी माती समान असते तेच खरे वैराग्यवंत ;आज वैराग्याचे मूर्तिमंत रूप म्हणजे श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथील शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज हे होय असे अभंग विवेचनात ह भ प थोटे महाराज यांनी भावना व्यक्त केली. शांतीब्रह्म एकनाथ महाराज नंतर शांतीब्रम्ह हि उपाधी खरोखर दोन संतानी जपली व त्याचं शोभून दिसते ते म्हणजे आळंदीचे ह भ प कुरे महाराज व श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथील शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज हे होय असे थोटे महाराज यांनी सांगितले. मनुष्य आयुष्यभर धन, सत्ता संपत्ती मिळवण्याच्या स्पर्धात आयुष्य खर्च करतो खरं सुख माणसाला मिळतच नाही मनुष्याला खरं सुख मिळण्याच असेल तर संताची कृपा असावी लागते. जीवनच खर सुख संताच्या विचारात आहे. म्हणून मनुष्याने गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांच्या चरणाचा दास व्हावे तर खर सुख मनुष्याला अनुभवता येईल असे प्रतिपादन ह भ प गोपाळ महाराज थोटे यांनी कीर्तन सेवेत व्यक्त केले. श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे चैत्र पौर्णिमेच्या निम्मित कीर्तन कार्यक्रमात टाळकरी, माळकरी विणेकरी मृदंग वादक भजनी मंडळी भाविक भक्तांची उपस्थिती होती चैत्र पौर्णिमेची महाप्रसादाचा पंगत जि.प. सदस्य गंगाधर भाऊ घुमरे, रमेश घुमरे, बाळासाहेब घुमरे, अण्णासाहेब लांडे यांची महाप्रसाद पंगत होती